नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०४/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या अवैध सुगंधी तंबाखुची साठवणूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार यांनी नागपूर जिल्हयात अवैध धंदयावर कारवाई करून अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेश दिले आहेत त्यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन उमरेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करीत असतांना दिनांक २३/०४/२०२४ चे १३.०० वा. ते १४.२० वा. सुमारास गोपनीय सुत्रधारकांकडुन माहीती मिळाली की, मौजा कळमना येथे अरविंद तुकाराम मोहतकर इसम यांचे घरा समोरील झोपडीमध्ये सुगंधीत तम्बाखु माल ठेवलेला आहे. अशी गुप्त माहीती मिळताच नमुद घटनास्थळी स्टाफच्या मदतीने रेड केली असता **आरोपी नामे– अरविंद तुकाराम मोहतकर, वय ३७ वर्ष, रा. कळमना ता. उमरेड जि. नागपुर** यांचे घरा समोरील झोपडीची घरझडती घेतली असता झोपडीमध्ये पांढऱ्या व गुलाबी रंगाच्या प्लास्टीक चुंगडीमध्ये इगल कंपनीचा सुंगधित तम्बाखु प्रत्येकी १ नग पकीट ४० ग्रॅम चा किंमत ६४ रु चा असे एक पांढऱ्या व एक गुलाबी रंगाच्या चुंगडीमध्ये एकुण ९५० सुगंधीत इगल तंबाखुचे पाकीट प्रत्येकी ६४ रु प्रमाणे असा एकुण किंमती ६०,८००/– रु. चा मुद्देमाल मिळाल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन आरोपीविरूद्ध पोस्टे उमरेड येथे कलम ३२८, २६२, २६३, १८८ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे उमरेड येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे यांचे नेतृत्वात पोहवा राधेशात कांबळे, प्रदीप चौरे, बालाजी साखरे, विष्णू जायभाई, पोना पंकज बट्टे यांनी पार पाडली.

## गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीला अटक

पोस्टे केळवद:— अंतर्गत मौजा झिल्पी येथे दिनांक २३/०४/२०२४ रोजी चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ दुर्गा रोशन उईके वय २८ वर्ष, रा. झिल्पी ता कळमेश्वर व **आरोपी नामे— रोशन गुलाबराव उईके, वय ४० वर्ष रा. झिल्पी ता. कळमेश्वर** हे पती पत्नी असुन फिर्यादी यांनी त्यांची ननंद यांना स्वयंपाकाबाबत काम सांगीतले असता यातील आरोपीने तु माझ्या बहीणीला कणीक भिजवायला का सांगीतले असे म्हणुन गॅसवर ठेवलेली कढई फिर्यादीकडे फेकल्याने कढईतील गरम तेल फिर्यादीचे डाव्या बाजुस डोक्यावर, चेहऱ्यावर पडल्याने चेहऱ्यावरील त्वचा भाजली व फोड आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे केळवद येथे आरोपीविरूद्ध कलम ३२६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि गेडाम मो. नं. ७७२२०००३४३ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि राकेश साखरकर, पोउपनि विलास गेडाम, पोहवा चलपे, नापोशि प्रकाश ठोके, पोशि देवकते यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर